# या आठवड्यातील हवामान अंदाज

## फळ छाटणीची तारीख : १५-०९-२०२२

## गुरुवार (२९-१२-२०२२) - बुधवार (०४-०१-२०२३)

| स्थान | तापमान (°C) | | पावसाची शक्यता | वातावरण | वाऱ्याचा वेग (कि/तास) | सापेक्ष आर्द्रता% | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | किमान | ऊचांक | | | किमा-जास्त | किमा | जास्त |
| **नाशिक** | 10-12 | 29-30 | **नाशिक**, **दिंडोरी**, **ओझर**, **पालखेड**, **कळवण**, **पिंपळगाव बसवंत**, **वणी**, **लोणी-** गुरुवार-बुधवार- पाऊस नाही | साफ ते ढगाळ | 07-09 | 13-30 | 32-62 |
| **पुणे** | 13-14 | 30-31 | **पुणे**, **फुरसुंगी**, **लोणी काळभोर**, **उरुळी कांचन**, **पाटस**, **यवत**, **नारायणगाव**, **बारामती-** गुरुवार-बुधवार- पाऊस नाही. | साफ ते ढगाळ | 07-08 | 11-18 | 28-56 |
| **सोलापुर** | 12-15 | 31-33 | **सोलापूर**, **लातूर**, **औसा**, **बार्शी**, **वैराग**, **नान्नज**, **पंढरपूर**, **तुळजापूर-** गुरुवार-बुधवार - पाऊस नाही | साफ ते ढगाळ | 05-12 | 12-19 | 25-45 |
| **सांगली** | 15-16 | 31-32 | **सांगली**, **आरग**, **तासगाव**, **कागवड पलूस**, **मिरज**, **कवठे**, **पळशी**, **खानापूर विटा**, **वाळवा**, **शेटफळ**, **शिरगुप्पी-** गुरुवार-बुधवार- पाऊस नाही | साफ ते ढगाळ | 04-07 | 12-20 | 25-54 |
| **विजयापुरा** | 13-15 | 31-32 | **विजयापुरा**, **चडचन तिकोटा आणि तेलसंग** - गुरुवार-बुधवार- पाऊस नाही. | साफ ते ढगाळ | 05-12 | 11-20 | 33-42 |
| **हैदराबाद** | 16-18 | 31-32 | **हैदराबाद**, **मेडचल**, **जहिराबाद-** गुरुवार-बुधवार- पाऊस नाही. | साफ ते ढगाळ | 05-12 | 13-26 | 41-60 |
| **सातारा** | 15-16 | 31-32 | **सातारा**, **खटाव**, **फलटण** – गुरुवार – पाऊस नाही. | साफ ते ढगाळ | 05-08 | 14-22 | 29-43 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **अहमदनगर** | 11-12 | 30-31 | **अहमदनगर**, **कर्जत**, **श्रीगोंदा**, **राहाता**, **कोपरगाव**, **संगमनेर**, **जामखेड**, **अकोले-** गुरुवार-बुधवार- पाऊस नाही. | साफ ते ढगाळ | 08-10 | 11-19 | 26-52 |
| **जालना** | 11-12 | 29-30 | **अंबड**, **जालना**, **गानसावंगी**, **मंठा**, **जाफ्राबाद** गुरुवार-बुधवार- पाऊस नाही | साफ ते ढगाळ | 07-09 | 12-21 | 27-50 |
| **बुलढाणा** | 11-12 | 29-30 | **बुलडाणा**, **चिखली**, **सिंदखेडराजा**, **दि.राजा-** गुरुवार-बुधवार- पाऊस नाही. | साफ | 05-08 | 14-23 | 25-49 |
| **कोल्हापूर** | 17-18 | 32-34 | **गगन-बावडा, कागल, करवीर-** गुरुवार-बुधवार-पाऊस नाही. | साफ ते ढगाळ | 06-07 | 15-22 | 45-61 |
| **बंगळुरू ग्रामीण** | 14-15 | 28-29 | **अनेकल, दोड्डाबल्लापूर, बेंगळुरू-पूर्व, बेंगळुरू-उत्तर, बेंगळुरू-दक्षिण-** गुरुवार-बुधवार- पाऊस नाही. | साफ ते ढगाळ | 11-12 | 14-18 | 66-73 |
| **बेलागावी** | 17-18 | 31-32 | **गोकाक, बेलागावी, चिकोडी, अथणी, खानापूर** गुरुवार-बुधवार- पाऊस नाही. | साफ ते ढगाळ | 06-07 | 16-22 | 33-49 |
| **बिदर** | 14-15 | 31-32 | **बिदर, बसवकल्याण, हुमनाबाद -** गुरुवार-बुधवार- पाऊस नाही. | साफ | 05-13 | 15-25 | 33-56 |
| **बागलकोट** | 13-15 | 30-31 | **बागलकोट, हुंगुंड, जमखंडी, मुधोळ -** गुरुवार-बुधवार- पाऊस नाही. | साफ ते ढगाळ | 07-12 | 14-20 | 35-46 |

**टीप: वरील हवामान माहिती खालील संकेतस्थळांवर दिलेल्या हवामान अंदाजाचा सारांश आहे**

https://www.wunderground.com/?cm_ven=cgi

https://imdagrimet.gov.in/weatherdata/BlockWindow.php

https://www.timeanddate.com/weather/india

**भाकृअनुप-राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्र अचूकतेचा दावा करत नाही.**

## **पाणी व्यवस्थापन** (डॉ. अजयकुमार उपाध्याय)

**फळ छाटणीनंतरचे दिवस: 119**

**पॅन बाष्पीभवन**: 3.5-5 मिमी.

**सिंचंनाच्या मात्रेविषयक सल्ला**

a. माती वापसा स्थितीत असल्यास, द्राक्षबागेला पाणी देऊ नये.

b. बोद ओले ठेवण्यासाठी आछादनचा (मलचिंग)वापर करावा. बोदावर आच्छादन केल्यास मुळांच्या कक्षेत क्षारवाढण्याची शक्यता कमी होईल.

c. फुलोरा येण्याच्या अवस्थेपासून ते मणी सेटिंग अवस्थेपर्यंत, ठिबकद्वारे @ 1800 ते 2500 लि/एकर/दिवस पाणी द्यावे. पुढे, जर वाढ आवशकतेपेक्षा जास्त असेल, तर सिंचनाच्या पाण्याचा वापर निम्म्याने कमी करावा.

d. मण्यांचा वाढीच्या अवस्थेमधे काढणीपर्यंत, ठिबकद्वारे @ 5100-6800 लि./एकर/दिवस पाणी द्यावे.

## **माती आणि खत व्यवस्थापन (डॉ. अजयकुमार उपाध्याय)**

1. तापमानामध्ये घट झाल्यास लवकर परिपक्व होणाऱ्या तसेच रंगीत जातींमध्ये देठाजवळ मणी तडकण्याची शक्यता असते. जर काढणीचे वेळापत्रक 30 दिवसात असेल तर बोरॉन आणि कॅल्शियमचा वापर टाळावा. यामुळे पैसे आणि वेळेचा अपव्यय होईल. द्राक्षबागेत आढळून आलेल्या कमतरतांच्या नुसार खतांची मात्रा द्यावी. कॅनोपी घनतेवर लक्ष केंद्रित करावे आणि त्यानुसार नियमन करावे. जर मण्यांचे तडकणे आढळून आल्यास, दुय्यम संसर्ग (रोग आणि फळमाशी) नियंत्रित करावे.

2. जर एसओपीचा वापरकेलेला नसेल तर १५ किलो एसओपी द्यावे व त्यानंतर एसओपी ची फवारणी करावी यामुळे द्राक्षवेलींमधील पालाश ची पातळी वाढण्यास मदत होईल हे विशेषतः कमी तापमानाच्या स्थितीत फायदेशीर ठरेल.

**फुलोरा ते मणी सेटींग पर्यन्तची अवस्था**

1 दाट कॅनोपी असलेल्या फूलोर्यामधे कुज ही समस्या होवु शकते. योग्य वायुवीजनासाठी सूर्यप्रकाश आत यावा यासाठी बाजूचे फुटवे काढून टाकावे आणि कॅनोपी कमी करावी. कूज (इनफ्लोरेनस नेक्रोसिस)ची समस्या टाळण्यासाठी किवा कमी करण्यासाठी कॅनोपीमध्ये पुरेसा सूर्यप्रकाश आणि हवेच्या हालचालीसाठी कॅनोपीचे व्यवस्थापन करावे.

2 या आठवड्यात 3-4 किलो फॉस्फोरिक ऍसिड दोन ते तीन वेळा टाकावे. लक्षात ठेवावे की सिंचनाच्या पाण्याचा सामु 6.0 च्या जवळ असावा.

3 देठ परीक्षण: 70% टिचकी अवस्था ,झाल्यावर देठाचे नमुने परीक्षणासाठी घेतले पाहिजेत. नमुन्यासाठी फुलोऱ्याच्या विरुद्ध असलेली पाने काढून घ्यावीत.

**मण्यांच्या वाढीची अवस्था**

1. मण्यांचा आकार 2-4 मिमी असल्यास, कॅल्शियम @ 2 ग्रॅम कॅल्शियम क्लोराईड किंवा 0.5 ग्रॅम Ca चिलेट प्रति लिटर फवारणी करावी. चांगल्या शोषणासाठी जीए च्या वापरानंतर(शक्यतो पुढच्या दिवशी) लगेच फवारणी करा.

2. मण्यांचा आकार ५-८ मिमी असल्यास, कॅल्शियम @ 2 ग्रॅम कॅल्शियम क्लोराईड किंवा 0.5 ग्रॅम Ca चिलेट प्रति लिटर फवारणी करा. चांगल्या शोषणासाठी जीए च्या वापरानंतर(शक्यतो पुढच्या दिवशी) लगेच फवारणी करावी.

3. ८-१० मिमी मण्यांचा आकारानंतर @ 10किलो/एकर मॅग्नेशियम सल्फेट ठिबकद्वारे द्यावे.

4. मण्यांचाआकार 8-10 मिमी असताना @ 3 ग्रॅम/एकर सल्फेट ऑफ पोटॅशची पानांवर फवारणी करावी.

5. 8-10 मिमी मण्यांचा आकारानंतर, चुनखडीयुक्त जमिनीसाठी अमोनियम सल्फेट @ 25 किलो/एकर 4 भागामध्ये आणि इतर जमिनीसाठी युरिया @ 15 किलो/एकर 3 भागामध्ये नायट्रोजनचा वापर सुरू करा. त्यानंतर लगेच पुढील दोन आठवडे 3-4 भागांमधे सल्फेट ऑफ पोटॅश किंवा 0-0-50 @ 25 किलो / एकर द्यावे.

6. माती चुनखडीयुक्त असल्यास, छाटणीनंतर 65-70 दिवसांनी झिंक सल्फेट आणि फेरस सल्फेट @ 5-10 किलो / एकर द्यावे.

**7.** मागील 20 दिवसांमध्ये जर पालाश दिला गेला नसेल तर फवारणे द्वारे 4-5 ग्रॅम सल्फेट ऑफ पोटॅश /लि आणि ठिबक द्वारे 15 किलो /एकरी याप्रमाणे द्यावी, कारण पालाशची पातळी वेली मध्ये कमी असल्यास भूरी रोगाचा संसर्ग होण्याची शक्यता असते**..**

## परिपक्कता ते काढणी पर्यंतचा काळ

**1.**पुढील दोन आठवड्यांसाठी सल्फेट ऑफ पोटॅश किंवा 0-0-50 **@** 25 किलो/एकर 3-4 भागामध्ये वापर करावा**.** या अवस्थेमध्ये एकूण पालाश (सल्फेट ऑफ पोटॅश) अंदाजे 60 किलो / एकर या प्रमाणात दयावे. त्यानंतर मॅग्नेशियम सल्फेट **@ 10** किलो/एकर दोन भागांमधे मध्ये वापरा**.**

2.चुनखडीयुक्त जमिन असेल तर मॅग्नेशियम सल्फेट आणि पोटॅशियम सल्फेट यांची **@** ४ ग्रॅम/लि ची फवारणी करावी.

**3.** मागील 20 दिवसांमध्ये जर पालाश दिला गेला नसेल तर फवारणे द्वारे 4-5 /लि ग्रॅम सल्फेट ऑफ पोटॅश आणि ठिबक द्वारे 15 किलो /एकरी याप्रमाणे द्यावी, कारण पालाशची पातळी वेली मध्ये कमी असल्यास भूरी रोगाचा संसर्ग होण्याची शक्यता असते.

4.योग्य सूर्यप्रकाश आणि हवा खेळती राहण्यासाठी कॅनोपीचे व्यवस्थापन करावे यामुळे मणी तडकण्याची समस्या कमी होऊ शकते किंवा उद्भवणार नाही.

# कॅनोपी व्यवस्थापन (डॉ. आर. जी. सोमकुंवर)

1. द्राक्षबागेतील किमान तापमान ६ ते ७ अंशांपर्यंत कमी होत आहे. यामुळे द्राक्ष मण्यांच्या शारीरिक क्रियांमध्ये असंतुलन निर्माण होते. हिरवे रंगद्रव्य गुलाबी रंगात बदलते. याला पिंक बेरी म्हणतात.
2. सध्या यावर नियंत्रणासाठी कोणताही उपाय नाही, परंतु स्वतंत्र घड वर्तमानपत्रांनी झाकल्यास पिंक बेरी कमी होण्यास मदत होईल.
3. उपलब्ध असल्यास बागेत मोकळे पाणी सोडणे कधीकधी द्राक्षबागेचे तापमान वाढवण्यास मदत करते.
4. बहुतेक वेळा उत्पादक द्राक्षबागेत पाणी भरतात आणि मग घड वर्तमानपत्राने झाकतात. परंतु यामुळे बागेतील हवामानात बदल होऊन भुरी साठी अधिक अनुकूल परिस्थिती निर्माण होऊ शकते.
5. वरील बाबी लक्षात घेता घड आच्छादन करण्यापूर्वी भुरी आणि पिठ्या ढेकूण (मिली बग) नियंत्रणास प्राधान्य दिले पाहिजे.
6. याव्यतिरिक्त, फवारणीसाठी जैविक घटकांचा वापर सुद्धा आपण करू शकतो.
7. रात्रीच्या तापमानात घट झाल्यामुळे मण्याच्या विकासात अडथळा येऊ शकतो. मण्याचा आकार वाढवण्यासाठी द्राक्ष उत्पादक अधिक पी.जी.आर. आणि बाजारात उपलब्ध असलेल्या बायोस्टिम्युलंट्सचा वापर करत आहेत. याचा परिणाम होऊन मणी घट्ट होतात, मण्यांमध्ये गोडी उतरण्यास उशीर होतो आणि त्यामुळे काढणीला उशीर होऊन वेल तणावात जाते.
8. वरील परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्याकरिता, मुळांभोवती हवा खेळती राहण्यासाठी बोध भुसभुशीत केल्यास चांगला परिणाम होईल.
9. फॉस्फरसचा वापर आणि शिफारस केलेल्या सिंचन पद्धतीचा अवलंब केल्यास मण्याचा आकार वाढण्यास मदत होईल.
10. जास्त प्रमाणात पी.जी.आर. वापरल्याने घडाच्या दांड्यावर तसेच मण्याच्या देठांवर गाठी निर्माण होतात. त्यामुळे पी.जी.आर. चा वापर शिफारशीनुसार व्हायला हवा.

## रोग व्यवस्थापन (डॉ. सुजॉय साहा) :

| | **रोगांचा धोका** |
|---|---|

| फळ छाटणीनंतरचे दिवस | केवडा | भुरी | बुरशीजन्य करपा | इतर |
|---|---|---|---|---|
| 119 | नाही | मध्यम | नाही | जीवाणू करपा - नाही<br>तांबेरा - नाही |

भुरीचा प्रादुर्भाव अनेक ठिकाणी विशेषत द्राक्ष मण्यांमध्ये दिसून येत आहे. हेक्साकोनाझोल 5 EC किंवा डायफेनोकोनाझोल 25EC किंवा टेट्राकोनाझोल 3.8 EW किंवा सायफ्लुफेनॅमिड 5% EW किंवा फ्लुओपायराम 200 + टेब्युकोनाझोल 200 SC किंवा फ्लक्सापायरोक्सॅड 75 g/L + डायफेन्कोनाझोल 50g/L वापरल्याने भुरी नियंत्रित होईल. नवीन बुरशीनाशक पॉलीऑक्सिन डी झिंक सॉल्ट 5% एस. सी. 600 मिली / हे. या दराने भुरी विरूद्ध चांगले परिणाम देईल. पोटॅशियम बायकार्बोनेट 5 ग्रॅ /ली. व ट्रायझोल बुरशीनाशके यांचे एकत्रित टाकी मिश्रण रोगाविरुद्ध प्रभावीपणे कार्य करेल. एम्पेलोमायसेस क्विस्कालिस 5 ग्रॅ /ली. किंवा बॅसिलस सबटिलिस 2 ग्रॅ /ली. चा एक वापर भुरी प्रतिबंधासाठी केला जाऊ शकतो. बुरशीनाशक फवारणीचे योग्य कव्हरेज होण्यासाठी वेलीवर द्राक्ष घडांची संख्या मर्यादित असणे आवश्यक आहे. ट्रायझोल फवारण्या दरम्यान सल्फर 80% WDG (2.5 ते 3 ग्रॅ /ली.) चा वापर वाढवला पाहिजे. बुरशीनाशके आणि जैविक बुरशीनाशके यांचे एकत्रीत  मिश्रण करू नये. झाडावरील ताण कमी करण्यासाठी आणि रोग प्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी जमिनीतील आर्द्रता योग्य प्रमाणात असावी.

## कीड आणि लाल कोळी  व्यवस्थापन. (डॉ. डी. एस. यादव)

**वाढीची अवस्था : फळछाटणी नंतर मणी वाढीची व मण्यात पाणी उतरण्याची अवस्था**

1. अनुकूल हवामानामुळे पिठ्या ढेकूण, फुलकिडे, कोळी आणि पाने खाणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता आहे. नाशिक आणि पुणे जिल्ह्यात मात्र वाढणाऱ्या थंडीमुळे पिठ्या ढेकणाचा प्रादुर्भाव तात्पुरता कमी होऊ शकतो.
2. पिठ्या ढेकणांच्या नियंत्रणासाठी बुप्रोफेझिन 25 SC ची 1.25 मिली (पीएचआय 65 दिवस) प्रतिलिटर पाणी अशी फवारणी परिणामकारक ठरते. पांढऱ्या मुळांच्या चांगल्या वाढीची खात्री करून क्लोथीअँनिडीन 50 WDG (पीएचआय 60 दिवस) ची मातीत आळवणी करणे सुद्धा फायदेशीर ठरते. एंटोमोजिनस बुरशी जसे की मेटान्हिझियम, बव्हेरिया किंवा लेकॅनीसीलीयमने झाडांना धुवून घेतल्यास पिठ्या ढेकणांची संख्या कमी होण्यास मदत होते. वर दिलेल्या पीएचआय चे कीटकनाशक उपलब्ध नसेल तर ट्रायसिलोक्झेन पॉलीइथर हे सरफेक्टन्ट 0.3 मिली प्रतिलिटर पाणी याप्रमाणे झाड धुवून घ्यावे. एक झाड धुण्यास 10-12 लिटर पाणी वापरावे. जेणेकरून घड तसेच झाडावरील पिठ्या ढेकूण आणि उत्सर्जित केलेला चिकट द्रव धुवून  जाईल. त्यानंतर झाड पाण्याने धुवून घ्यावे.
3. फुलकिडीच्या नियंत्रणासाठी अतिरिक्त फुटी काढून टाकाव्यात. कीटकनाशकाची आवश्यकता भासल्यास अबामेक्टिन चा वापर करावा. यामुळे सोबतच कोळी या किडीचे व्यवस्थापन सुद्धा होते.
4. पाने खाणारी अळी आणि फुलकिड्यांच्या नियंत्रणासाठी इमामेक्टिन बेन्झोएट 5 SG चा 88 ग्रॅम प्रति एकर किंवा सायंट्रॅनिलीप्रोल 10 OD चा 0.7 मिली प्रतिलिटर पाणी असा वापर प्रभावी ठरतो.
5. आर्द्रतेचे प्रमाण जास्त असलेल्या द्राक्षपट्ट्यात घडात जाळे करणारी अळी घडांना नुकसान करू शकते. कीटकनाशक घडाच्या आत पोहचू शकत नसल्याने अळ्या हाताने गोळा करून नष्ट करणे

हाच प्रभावी उपाय ठरतो. पानावरील अळ्या सुद्धा अशाच नष्ट कराव्यात जेणेकरून त्या नंतर घडात प्रवेश करणार नाहीत. इमामेक्टिन बेन्झोएट 5 SG ची 0.22 ग्रॅम प्रतिलिटर पाणी किंवा सायंट्रॅनिलीप्रोल 10 OD ची 0.7 मिली प्रतिलिटर पाणी अशी फवारणी प्रभावी नियंत्रण देते.

6. बऱ्याच द्राक्षपट्ट्यात कोळी या किडीचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता आहे. प्रादुर्भाव आढळून आल्यास सल्फर 80 WDG ची 1.5 ते 2 ग्रॅम प्रतिलिटर किंवा अबामेक्टिन 1.9 EC ची 0.75 मिली प्रतिलिटर (पीएचआय 30 दिवस) किंवा बायफेनझेट 22.6 SC ची 0.5 मिली (पीएचआय 30 दिवस) प्रतिलिटर पाणी याप्रमाणे फवारणी करावी.
7. काही भागात घडांवर माव्याचा प्रादुर्भाव दिसून येऊ शकतो. नियंत्रणासाठी इमिडाक्लोप्रिड 17.8 SL ची 0.4 मिली प्रतिलिटर पाणी (पीएचआय 60 दिवस) याप्रमाणे फवारणी करावी.